Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ४० ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १ जानेवारी २०१९ ते सोमवार ७ जानेवारी २०१९

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | ठाण्यात नशाचा वाढता अंमल

कांद्याच्या भावात प्रतिक्विंटल ३०० रुपयांची वाढ | ४

## राज्यात व केंद्रात काँग्रेसची सत्ता येणार

**कराड (योगेश होळंब)-** राजकारणात यश - अपयश सुरूच असते. मात्र भाजपा सरकारने लोकांची दिशाभूल करत केंद्रात व राज्यात सत्ता मिळवली आहे. त्यामुळेच लोक भाजपाला कंटाळले असून काही दिवसांपूर्वी तीन राज्यातील निवडणूक



निकालावरून हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच आता राज्यात व केंद्रात काँग्रेसची सत्ता येईल, असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. येथील कोल्हापूर नाका परिसरात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसचा वर्धापनदिन साजरा केला. आ. आनंदराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमावेळी केक कापून नागरिकांना पेढे वाटत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. काँग्रेसचे कराड शहराध्यक्ष नगरसेवक राजेंद्र माने, ज्येष्ठ पदाधिकारी झाकीर पठाण, ज्येष्ठ सदस्य उत्तमराव दशवंत, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश सचिव आदिल मोमीन, माजी नगरसेवक अशोकराव पाटील, प्रदीप जाधव, प्रताप पाटील, धनराज शिंदे यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

झाकीर पठाण, राजेंद्र माने यांनी काँग्रेस संपवण्याची भाषा गेल्या चार वर्षात ऐकण्यास मिळाली. मात्र काँग्रेसने तीन राज्यात सत्ता मिळवली आहे. काँग्रेसने पुन्हा भरारी घेतली आहे. भाजपा सरकारने लोकांची दिशाभूल करत सत्ता मिळवली आहे. लोकांची फसवणूक झाल्याचे आता समोर आल्याने लोकच सरकारला कंटाळले आहेत.

# मुंबई विकास आराखड्यात एक लाख कोटीचा घोटाळा

## विखे-पाटील यांचे आरोप मुख्यमंत्र्यांनी फेटाळले





**मुंबई (विशाल कारंडे)- मुंबई विकास नियंत्रण नियमावलीत राज्य सरकारने केलेल्या बदलांमुळे सात निवडक बिल्डरांना एक लाख कोटी रुपयांहून अधिकचा लाभ झाला असून, या घोटाळयात मुख्यमंत्री कार्यालयाने १० हजार कोटींचे डील केले आहे. त्यातील ५ हजार कोटींचा पहिला हप्ता पोचदेखील झाल्याचा खळबळजनक आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केला आहे. १५ जानेवारीपर्यंत मुख्यमंत्र्यांनी डीसीपीआरमधील बदल रद्द करून या जमिनी ताब्यात घ्याव्यात अन्यथा न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असून सेबीकडेही तक्रार करण्याचा इशारा विखे-पाटील यांनी दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र हे आरोप फेटाळून लावताना, विखे-पाटील यांनी हे आरोप एक तर सिद्ध करावेत अथवा बिनशर्त माफी मागावी; अन्यथा त्यांच्याविरुद्ध मानहानीचा दावा दाखल केला जाईल, असा इशारा दिला आहे.**

विरोधी पक्ष नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषद घेऊन मुंबईच्या विकास आराखड्यात फेरबदल करताना प्रचंड मोठा घोटाळा झाला असल्याचा आरोप करत याबाबतचे पुरावेच पत्रकार परिषदेत सादर केले. मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील कोणत्या बदलांमुळे कोणत्या बिल्डरांना किती हजार कोटींचा लाभ झाला, याची यादीच त्यांनी जाहीर केली. मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत केवळ १४ किरकोळ बदल केल्याचा मुख्यमंत्र्याचा दावा साफ खोटा आहे. सरकारने केलेले बदल इतके महत्त्वाचे व व्यापक परिणाम करणारे आहेत, की एका एका बदलामुळे किमान १०० आरक्षणे बदलली गेली आहेत. या नियमावलीत १४ नव्हे तर एकूण २५०० बदल झाले आहेत. या बदलांच्या माध्यमातून मुख्यमंत्री आणि मुंबई महापालिकेच्या आयुक्तांनी मुंबईचा सौदा केल्याचा गंभीर आरोपही राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केला. ते म्हणाले, पूर्वी केवळ विकास नियंत्रण नियमावली तयार केली जायची. या सरकारने त्यामध्ये प्रोत्साहन हा शब्द समाविष्ट करून त्याचे नाव मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली असे केले; पण या माध्यमातून मुंबई शहराच्या विकासाला प्रोत्साहन देण्याऐवजी बिल्डरांना अधिक नफा मिळवून देण्यासाठी आणि त्याचा एक वाटा सरकारच्याही पदरात टाकला जावा यासाठी प्रोत्साहन दिले जाते आहे. राज्यातील सर्व महापालिकांमध्ये समान एफएसआयचा नियम असताना केवळ मुंबईसाठी एक अतिरिक्त एफएसआय देण्याच्या नियमामुळे बिल्डरांना घसघशीत लाभ झाला आहे. ओबेराय बिल्डर्सच्या गोरेगावमधील एकाच प्रकल्पाला या निर्णयामुळे शेकडो कोटींचा लाभ झाल्याचा आरोप विखे- पाटील यांनी केला. विकास नियमावलीत अग्निसुरक्षेशी अक्षम्य तडजोड करण्यात आली आहे. इमारतींमधील अंतर कमी करण्याच्या एकाच निर्णयामुळे संपूर्ण मुंबईतील बिल्डरांना किती लाभ झाला असेल, याचा अंदाज काढणेही कठीण असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी ९ मीटर रुंदीचा रस्ता असतानाही अग्निशमन दलाची वाहने जात नव्हती. आता ६ मीटर रुंदीचे दोन रस्ते बांधण्याचा नियम केल्याचा दावा सरकार करत असले तरी अधिक लहान झालेल्या रस्त्यांमधून अग्निशमन वाहने जाणार कशी, असा प्रश्न विखे-पाटील यांनी उपस्थित केला. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये पूर्वी लोकसंख्येची घनता विचारात घेता अतिशय अपवादात्मक परिस्थितीत ४ एफएसआय दिला जात असे. परंतु, या सरकारने दोन इमारतींमधील अंतर कमी करून आणि एफएसआयमध्ये वाढ केल्याने हिरेन पटेल आणि ओमकार बिल्डर्स या दोन विकासकांना ८ हजार कोटींचा फायदा झाल्याची माहिती राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

## मृत्यूनंतर एक वर्षाने तेलगीची स्टॅम्प पेपर घोटाळ्यातून सुटका

**नवी दिल्ली (सुनील आढाव)-** संपूर्ण देशभर गाजलेल्या बनावट स्टॅम्प पेपर घोटाळ्यातील एका खटल्यात प्रमुख आरोपी अब्दुल करीम तेलगी याची सोमवारी नाशिक जिल्हा न्यायालयाने निर्दोष सुटका केली. गेल्यावर्षीच तेलगीचा बंगळुरूच्या व्हिक्टोरिया हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने मृत्यू झाला. त्यानंतरही या प्रकरणी सुनावणी सुरू होती. अखेर न्यायालयाने सोमवारी निकाल दिला.

बनावट स्टॅम्प पेपर घोटाळ्यामध्ये तेलगीला नोव्हेंबर २००१ मध्ये अजमेरमधून अटक करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या सुनावणीचा निकाल देताना १७ जानेवारी २००६ रोजी न्यायालयाने त्याला व साथीदारांना ३० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली होती. तेलगीला शिक्षा



भोगण्यासाठी बंगळुरूमधील कारागृहात ठेवण्यात आले होते. त्याप्रकरणी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने तेलगीला तब्बल २०१ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला होता. तेलगीला कारागृहात विशेष वागणूक दिली जात असल्याचा कारागृह विभागाच्या अहवाल पोलिस महासंचालक डी. रुपा यांनी दिल्यानंतर पुन्हा एकदा खळबळ उडाली होती. कारागृहातील तीन ते चार कैदी तेलगीपर्यंत सर्व माहिती आणि महत्त्वाचे संदेश पोहोचवत असल्याचे त्यांनी आपल्या अहवालात म्हटले होते.

वेगवेगळ्या लोकांचे फोन टॅप केल्यानंतर कोट्यवधी रुपयांच्या बनावट स्टॅम्प पेपर घोटाळ्याचा उलगडा झाला होता. तेलगी आणि त्याचे साथीदार वेगवेगळ्या संस्था, बँका, विमा कंपन्या यांना बनावट स्टॅम्प विकत होता.

## देशात अणीबाणीसदृश स्थिती -शरद पवार

**नगर (सम्यक कासारे)- 'सरकारकडून उच्च न्यायालय, सीबीआय, आरबीआयसारख्या संस्थांमध्ये हस्तक्षेप सुरू आहे. विरोधकांना दाबून टाकण्यासाठी सत्तेचा गैरवापर होत असल्याचे मिशेल प्रकरणावरून दिसते. एकंदर देशात अणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राजकीय पक्षांना एकत्र यावे लागेल,'' असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी आज केले.**

अहमदनगर जिल्हा



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शताब्दी महोत्सवाचा समारोप पवार यांच्या हस्ते झाला, त्या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, 'स्वातंत्र्यानंतर देशात अनेक सरकारे येऊन गेली. बऱ्याच पंतप्रधानांचे कामही जवळून पाहिले; परंतु विरोधकांना अडचणीत आणण्यासाठीच सत्तेचा गैरवापर करणारा पंतप्रधान पाहिला नाही. १९७५ मध्ये काँग्रेसने अणीबाणीचा निर्णय घेतला, त्याचा परिणाम त्यांना निवडणुकांमध्ये भोगावा लागला. दिलगिरी व्यक्त केल्यानंतर जनतेने त्यांना स्वीकारले. त्यानंतर आता तशी परिस्थिती आहे. त्यांनी ऑगस्टा हेलिकॉप्टर खरेदी प्रकरणातील मिशेल नावाचा एजंट आणला. तो 'कसा' बोलेल हेही मोदींनी अगोदरच सांगून टाकले. यावरून लोकांना काय समजायचे ते समजले. त्याच्या तोंडून सोनिया गांधींचे आणि अप्रत्यक्षरीत्या राहुल गांधी यांचे नाव आल्याचे समजते. विशेष म्हणजे, गेल्या दोन महिन्यांपासून मोदी जाहीर बोलत होते. सत्तेचा इतका अतिरेक कधीच पाहिला नव्हता. उद्या संसदेमध्ये सर्व विरोधकांना एकत्र करून हा मुद्दा मांडू.'' चार राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला सत्ता मिळाली.

## राज्यात थंडीचा कडाका कायम



**मुंबई (अमोल गुडेकर)-** राज्यात थंडीचा कडाका कायम आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भाच्या बहुतांश भागातील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय घट, तर कोकणात लक्षणीय घट झाली. मध्य महाराष्ट्रातील थंडीची लाट तीव्र बनली असून, नगर ४.५, पुणे ६, नाशिक ७ अंश सेल्सिअस अशी किमान तापमानाची नोंद झाली. दरम्यान, नागपुरात थंडीने गारठून दोघांचा मृत्यू झाला. उत्तर भारतातून राज्याच्या दिशेने येणाऱ्या थंड वाऱ्यांचा प्रभाव वाढला आहे. बंगालचा उपसागर व अरबी समुद्रात कमी दाबाची क्षेत्रे किंवा द्रोणीय स्थिती सध्या अस्तित्वात नाही.राज्यातील वातावरण निरभ्र असून, या सर्व स्थितीमुळे कोकण, मुंबईसह संपूर्ण राज्य थंडीने गारठल्याचे दिसते. दरम्यान, राज्यातील नीचांकी किमान तापमानाची नोंद विदर्भातील नागपूर येथे ४ अंश सेल्सिअस एवढी करण्यात आली. तर गोंदिया ५.२, वर्धा ७.५, अकोला ५.९ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदविले गेले.

## आशिष शेलार आणि राज ठाकरे यांची कृष्णकुंजवर गुप्त बैठक

**मुंबई (विशाल कारंडे)-** भाजप मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात गुप्त बैठक झाल्याची माहिती आहे. ही बैठक घरगुती स्वरुपाची



असली तरी त्यात राजकीय चर्चा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

आशिष शेलार हे राज ठाकरेंच्या भेटीला कृष्णकुंज या निवासस्थानी आले होते. यावेळी त्यांची घरगुती विषयांवर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राज यांचे पुत्र अमित यांच्या लग्नाला भाजपकडून कोणाला बोलवायचं, यावर चर्चा झाल्याची माहिती आहे. रविवार, २७ जानेवारीला दुपारी १२ वाजून ५१ मिनिटांनी अमित ठाकरेंच्या लग्नाचा मुहूर्त आहे. मुंबईतील लोअर परळ भागातल्या 'सेंट रेजिस'मध्ये हा विवाहसोहळा पार पडणार आहे. प्रसिद्ध बॅरिअॅट्रिक सर्जन डॉ. संजय बोरुडे यांची कन्या मितालीसोबत अमित विवाहबंधनात अडकणार आहेत. अमित आणि मिताली यांची जुनी ओळख होती.

## धोबी समाजाच्या आरक्षणासाठी प्रयत्न - राज्य सरकार

**मुंबई (सम्यक कासारे)-** नववर्षातदेखील राज्य सरकारसमोरील जात आरक्षणाचा तिढा कमी होण्याची चिन्हे नाहीत. मराठ्यांचा विशेष मागास प्रवर्गात समावेश केल्यानंतर आता धोबी समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्यासाठी राज्य सरकार लवकरच निर्णय घेणार आहे. यासाठी राज्य सरकार केंद्राला शिफारस करणार असून, तसा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरीसाठी येणार आहे.



मराठा, धनगर आरक्षणाचे राज्य सरकारसमोर संकट उभे असतानाच आता लहान-मोठ्या जातींच्या दबावापुढेदेखील सरकारला शरण यावे लागते आहे. धोबी समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश व्हावा, यासाठी धोबी समाजाची राज्यभरात आंदोलने सुरू आहेत. राज्य सरकारने यापूर्वी १९७७, १९७९, १९९४ आणि २००४ मध्ये केंद्र सरकारला याबाबतचा प्रस्ताव पाठवला होता, जो केंद्राने फेटाळलेला होता. मात्र, राज्यात जात आरक्षणाचा दबाव मोठ्या प्रमाणात वाढलेला असल्याने राज्य सरकारदेखील या दबावाला बळी पडत पुन्हा केंद्राला शिफारस करण्याची तयारी दाखवली आहे.

धोबी समाजाला आरक्षण देता येणार नाही, असा स्पष्ट अहवाल बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था (बार्टी) ने दिलेला आहे. 'बार्टी'च्या अहवालात, कपडे धुण्याच्या कामामुळे अस्पृश्यता राखली जात नाही. त्यामुळे हा समाज सामाजिक मागास नाही, मात्र धोबी समाजात शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण असल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




## मोहन भागवतांच्या कार्यक्रमादरम्यान दोन गटात तुंबळ हाणामारी

**रांची (हिंदुस्थान समाचार)-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांच्या झारखंडमधील एका कार्यक्रमादरम्यान, कार्यकर्त्यांच्या दोन गटामध्ये तुंबळ हाणामारी झाल्याचे वृत्त आहे. भागवत कार्यक्रम स्थळावरुन निघून गेल्यानंतर ही हाणामारी झाल्याचे कळते.

सुत्रांच्या माहितीनुसार, झारखंडमधील धनबाद येथे रविवारी क्रीडा भारतीच्या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्यासोबत यावेळी मुख्यमंत्री रघुबरदास हे देखील उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर जसे हे दोघेही निघून गेले त्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये काही कारणास्तव वाद झाला. या वादाचे पर्यावसन नंतर तुंबळ हाणामारीत झाले. यावेळी



एकमेकांना शिव्यांची लाखोली आणि लाथा-बुक्यांनी मारहाण करण्यात आली.

स्थानिक माध्यमांतील वृत्तानुसार, भागवत ज्या गाडीतून आले होते. त्या ड्रायव्हरसोबत इतर कार्यकर्त्यांचा काही कारणाने वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की तो थेट गुद्द्यांवर आला. मात्र, अद्यापही या मारहाणीचे कारण स्पष्ट झाले नाही.

या घटनेपूर्वी कार्यक्रम शांततेत पार पाडला आणि भागवत तसेच मुख्यमंत्री घटनास्थळावरुन निघून गेले होते. दरम्यान, कार्यक्रमात बोलताना भागवत यांनी शिक्षणाला धर्मासोबत जोडायला हवे अशी भुमिका मांडली. त्यांनी धर्म आणि शिक्षण हे एकमेकांना पुरक असल्याचे म्हटले. यावेळी त्यांनी शिक्षणाच्या बाजारीकरणावर चिंता व्यक्त केली. शिक्षणाच्या बाजारात आता ३ हजार अरब डॉलर इतकी उलाढाल होत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, भागवत यांच्या कार्यक्रमानंतर झालेला हाणामारीचा प्रकार एक चिंतेचा विषय बनला आहे. कारण, काही दिवसांपूर्वीच सुरक्षा एजन्सीजने त्यांच्या जीवाला धोका असल्याचे म्हटले होते. सुरक्षा एजन्सीजने आरएसएस प्रमुखांची सुरक्षा व्यवस्था राष्ट्रीय सुरक्षा गार्डच्या (एनएसजी) कमांडोजमध्ये अपग्रेड करण्याची शिफारस केली होती. मात्र, अद्याप त्यांना झेड प्लस सुरक्षा व्यवस्थाच देण्यात येत आहे.

## लोकसभा निवडणूक स्वबळावर लढणार –राणे

**कणकवली (प्रतिनिधी)-** राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि वरिष्ठ नेते नारायण राणे यांनी लोकसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा लढणार हे अद्याप जाहीर केलेले नसले तरी निवडणूक आचारसंहिता



लागू झाल्यानंतर याचा निर्णय घेऊ, अशी माहिती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष खासदार राणे यांनी दिली. कणकवलीतल्या पडवे येथील लाइफटाइम हॉस्पिटलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीतही पाच राज्यांच्या निकालाप्रमाणेच धक्का बसेल, असे राणे म्हणाले आहेत. तसेच यावेळी त्यांनी भाजप नेते प्रमोद जठार यांच्यावरही टीका केली. भाजप जिल्हाध्यक्ष प्रमोद जठार यांना राजकारण कळत नाही. ते राजकारणात अजून लहान आहेत. माझा पक्ष एनडीएचा घटक पक्ष आहे, असेही त्यांनी सांगितले आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### पेट्रोल, डिझेल वर्षभरातील नीचांकी पातळीवर

**नवी दिल्ली–** गेल्या काही दिवसांत इंधन दरात सातत्याने घट होऊन पेट्रोल आणि डिझेलचे दर वर्षभरातील नीचांकी पातळीवर आले आहेत. आज पेट्रोलचा दर २२ पैसे तर डिझेल २३ पैशांनी कमी झाला. नव्या दरानुसार, दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर प्रति लीटर ६९.०४, तर डिझेलचा दर ६३.०९ रुपयांवर होता. तर मुंबईत पेट्रोलचा दर प्रति लीटर ७४.६७ तर डिझेल ६६.०१ रुपयांवर होता.




१८ ऑक्टोबरपासून इंधन दरांमध्ये सातत्यानं घसरण होत असून, पेट्रोल दरात आत्तापर्यंत १३.७९, तर डिझेलच्या दरात १२.०६ रुपयांची घसरण झाली. त्यापूर्वी ४ ऑक्टोबर रोजी मुंबई व दिल्लीत पेट्रोलचे दर अनुक्रमे ९१.३४ व ८४ रुपयांवर, तर डिझेलचे दर अनुक्रमे ८०.१० व ७५.४५ रुपयांवर गेले होते. १६ ऑगस्टपासून इंधन दरवाढीस सुरुवात झाली होती.

### भाजप नगरसेविकेच्या पतीवर भरदिवसा गोळीबार, छातीत घुसली गोळी, नुकताच केला होता भाजपमध्ये प्रवेश

**जळगाव-** जळगाव महापालिकेचे माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्यावर सकाळी मोटारसायकल वरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी गोळी झाडली. संतोष पाटील यांच्या छातीत गोळी घुसली आहे. त्यांना तातडीने उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे दाखल करण्यात आले आहे. ही घटना सकाळी साडे दहा वाजता घडली. संतोष पाटील हे गिरणा नदीकडे शेतात जात असताना त्यांच्यावर हल्ला झाला. संतोष पाटील यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती मिळताच त्यांचे समर्थकांनी तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रचंड गर्दी केली आहे. संतोष पाटील यांनी नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपात प्रवेश केला आहे. त्यांच्या पत्नी भाजपच्या नगरसेविका आहेत.



### मुलांना जन्म द्या, अन् रोख बक्षीस मिळवा

**टोकिओ-** वृद्धांची वाढती संख्या आणि घटत चाललेला जन्मदर, यामुळे जपानची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, या देशात असे एक शहर आहे की, तेथे या घटत्या लोकसंख्येवर पर्याय शोधण्याचे प्रयत्न होत आहेत. दक्षिण जपानमधील कृषिप्रधान शहर असलेल्या नागीची लोकसंख्या सहा हजार आहे. लोकसंख्या वाढवण्याबाबत या शहराचे प्रशासन २००४ पासून कार्य करत आहे. याअंतर्गत कुटुंबात जन्मणाऱ्या पहिल्या अपत्यास एक लाख येन (६३ हजार रुपये) नागी शहर प्रशासनाकडून बक्षिसादाखल देण्यात येतात. दुसऱ्या अपत्यास ९५ हजार रुपये, तर पाचव्या अपत्यास अडीच लाख रुपये देण्यात येतात. याशिवाय स्वस्तात घर व अन्य सोयीही उपलब्ध करून देण्यात येतात.



### शीख विरोधी दंगलः सज्जनकुमारांची शरणागती

**नवी दिल्ली-** १९८४ साली झालेल्या शीखविरोधी दंगल प्रकरणात दोषी आढळलेले काँग्रेस नेते सज्जनकुमार यांनी हायकोर्टासमोर शरणागती पत्करली. कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर त्यांची रवानगी तिहार जेलमध्ये करण्यात येणार आहे. सज्जन कुमार यांच्याआधी महेंद्र यादव आणि किशन खोखर या दोषींनीदेखील शरणागती पत्करली आहे. सज्जनकुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९८४ मध्ये दिल्लीतील कँट परिसरात ५ शिखांच्या हत्येप्रकरणी दिल्ली हायकोर्टाने सज्जनकुमार यांना दोषी ठरवले असून ३१ डिसेंबरपर्यंत शरणागती पत्करण्याचे आदेश कोर्टाने दोषींना दिले होते. तिहार तुरुंगात सज्जन कुमार यांना जेल क्रमांक-२ मध्ये ठेवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



# ६०० रणगाडे पाकिस्तान नियंत्रण रेषेवर करणार तैनात, भारताच्या डोकेदुखीत वाढ

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)-** पाकिस्ताननं सैन्याला बळकटी देण्यासाठी ६०० रणगाडे सैन्यात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. यात रशियात तयार करण्यात आलेले टी-९० रणगाड्यांचाही समावेश असणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पाकिस्तान या रणगाड्यांना भारताला लागून असलेल्या नियंत्रण रेषेवर तैनात करणार आहे. पाकिस्तान सैन्यात सामील करत असलेले रणगाडे ३ ते ४ किलोमीटर मारा करू शकतात. त्यामुळे भारतानं आतापासूनच सतर्क राहण्याची गरज तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

रणगाड्यांशिवाय पाकिस्तान सेना १५० एमएम एसपी माइक-१० गन्सही खरेदी करणार आहे. पाकिस्तान सरकार या गन्स इटलीतून खरेदी करत आहेत. ज्यात १२० गन्सची डिलिव्हरी झाली आहे. पाकिस्तानची नजर टी-९० रणगाडे खरेदीवर आहे. जे भारतीय सैन्यात आधीपासूनच तैनात आहेत. पाकिस्तानचीही रशियाबरोबर मोठा संरक्षण करार करण्याची इच्छा आहे. स्वातंत्र्यानंतर रशिया हा भारताचा सर्वात मोठा आणि विश्वसनीय संरक्षण भागीदार राहिला आहे. अशातच पाकिस्तान रशियाबरोबर वाढवत असलेली जवळीक ही भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. पाकिस्तान २०२५पर्यंत संरक्षण ताफ्याला मजबूत करण्याच्या तयारीत आहे.



ज्याअंतर्गत पाकिस्तान ३६० टँक विकत घेणार आहे. तर चीनच्या मदतीनं २२० रणगाडे स्वदेशीच बनवण्याची पाकिस्तानची योजना आहे. गेल्या वर्षभरापासून जम्मू-काश्मीरच्या सीमावर्ती भागात तणाव वाढत चालला आहे. त्याच वेळी पाकिस्तान स्वतःचं सैन्य सामर्थ्य वाढवत असल्यानं भारतासाठी ही धोक्याची घंटा आहे.

## कांद्याच्या भावात प्रतिक्विंटल ३०० रुपयांची वाढ, शेतकऱ्यांना दिलासा

**मनमाड (विजय पंचमुख)–** दोनच दिवसांपूर्वी केंद्र शासनाने कांदा निर्यातीवर देण्यात येणारी सबसिडी दुप्पट करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कांद्यावरील अनुदानात ५ वरून १० टक्क्यांची वाढ झाली. परिणामी आज लासलगाव, मनमाडसह नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या भावात सुधारणा झाली आहे. कांद्याच्या प्रतिक्विंटल दरात आज ३०० रुपयांची वाढ झाल्याचे पहायला मिळाले.



शुक्रवारी मनमाडमध्ये लाल कांद्याला ५५० रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळत होता. त्यामध्ये आज ३०० रुपयांची वाढ होऊन शेतकऱ्यांना ८५० रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळाला. कांद्याला मिळणाऱ्या दरात वाढ झाल्याने शेतकऱ्याना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, शुक्रवारी लासलगाव बाजार समितीत लाल कांद्याला सरासरी ७७३ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला होता. त्यामध्ये आज १५८ रुपयांची वाढ होऊन शेतकऱ्यांना ९३१ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला.

## 'बायको शिवसेनेसारखी पाहिजे, लफडी कळली तरी सोडत नाही'

**मुंबई (विशाल कारंडे)-** आमदार नितेश राणे आणि शिवसेना यांच्यातील वादाचा कलगीतुरा अवघ्या महाराष्ट्राला माहितीय. राणेंवर खरमरीत टीका करायला शिवसेना विसरत नाही, अन् शिवसेनेचे वाभाडे काढायला नितेश राणे नेहमीच तयार असतात. आता, नितेश राणेंनी उद्धव ठाकरेंच्या टीकेचा त्यांच्याच भाषेत समाचार घेतला आहे. असंख्य नवरे बोलत असतील, बायको शिवसेनेसारखीच पाहिजे, लफडी कळली तरी सोडत नाही, अशा शब्दात नितेश राणेंनी शिवसेनेला लक्ष्य केलं आहे.

शिवसेना आणि राणेपुत्र आमदार नितेश राणे यांच्यातील वाद नेहमीच चर्चेत असतो. आता पुन्हा एकदा, नितेश राणेंनी शिवसेनेच्या सत्तेतील सहभागावरुन सेनेला टार्गेट केलं आहे. असंख्य नवरे बोलत असतील.. बायको शिवसेनेसारखी पाहिजे!! लफडी कळली तरी सोडत नाही.. जास्तच जास्त तर



काय.. एक सामन्यातून अग्रलेख!! बाकी संसार सुरु!! असं ट्विट करुन नितेश राणेंनी शिवसेना आणि उद्धव ठाकरेंवर खरमरीत टीका केली आहे. दरम्यान, आजच्या सामनातील अग्रलेखातून उद्धव ठाकरेंनी भाजपावर तोंडसुख घेतले होते. अहमदनगर महानगर पालिकेमध्ये शिवसेनेच्या हातातोंडाशी आलेला सत्तेचा घास भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने हिसकावून घेतला.

## कोल्हापुरात निर्भया पथकाचा टवाळखोर तरुणांना दणका

**कोल्हापूर (दिनेश पाटील)–** कोल्हापूर मध्ये ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या निर्भया पथकाने हुल्लडबाज तरुणांवर कारवाई केली आहे. शहरातील विवेकानंद कॉलेज परिसर आणि रंकाळा परिसरात निर्भया पथकानं कारवाई केली आहे. विवेकानंद महाविद्यालयाच्या परिसरात निर्भया पथकाची गाडी आल्यावर काही हुल्लडबाज तरुणांची चांगलीच पळापळ झाली. महाविद्यालयात आगावपणा आणि हुडबाजी करणाऱ्या तरुणांना पथकाने कॉलेजच्या गेटवर उठाबशा काढण्यास सांगितल्या तर काही जणांना अंगठे धरण्याची शिक्षा देत समज देण्यात आली. प्रत्येक शहरात टवाळखोर तरुणांवर नजर ठेवण्यासाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात ही कारवाई करण्यात आली आहे.

## रोहितला कन्यारत्न! चौथी टेस्ट खेळणार नाही

**मुंबई (अमोल गुडेकर)-** ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या टेस्टमध्ये भारताचा १३७ रननी विजय झाला. या विजयाबरोबरच भारतानं २०१८ या वर्षाचा शेवट गोड केला. भारतीय टीमचा खेळाडू रोहित शर्माच्या वैयक्तिक आयुष्यातही या वर्षाचा शेवट गोड झाला आहे. रोहित शर्माची पत्नी रितीका सचदेवनं मुलीला जन्म दिला आहे. मुलीच्या जन्माची बातमी कळताच रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाहून मुंबईला रवाना झाला आहे. त्यामुळे तो ऑस्ट्रेलियाविरुद्धची चौथी टेस्ट खेळू शकणार नाही. ३ जानेवारीपासून या टेस्ट मॅचला



सुरुवात होणार आहे. रोहित शर्मा भारतात परत येत असला तरी तो ८ जानेवारीला पुन्हा ऑस्ट्रेलियाला रवाना होईल. १२ जानेवारीपासून भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या वनडे सीरिजला सुरुवात होणार आहे. या वनडे सीरिजसाठी रोहित उपलब्ध आहे, असं बीसीसीआयनं सांगितलं. चौथ्या टेस्टला रोहित मुकणार असला तरी भारतीय टीमनं अजून रोहितच्या बदली खेळाडूची घोषणा केलेली नाही. मेलबर्नमध्ये झालेल्या तिसऱ्या टेस्टच्या पहिल्या इनिंगमध्ये रोहित शर्मानं अर्धशतक केलं होतं.

# भाजप-राष्ट्रवादीचे लफडे जुनेच
## उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई (सम्यक कासारे)- अहमदनगरमध्ये भाजप-राष्ट्रवादीनं खेळलेल्या राजकारणाचा शिवसेनेला अजिबात धक्का बसलेला नाही. भाजप-राष्ट्रवादीचे अनैतिक राजकीय संबंध जुनेच असून महाराष्ट्रातील सध्याच्या सरकारचा जन्मच मुळात या संबंधांतून झाला आहे. अहमदनगरमधील नव्या पॅटर्नमुळं फक्त ते उफाळून आले इतकेच,' अशी टीका 'सामना'च्या अग्रलेखातून शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे.**

एकीकडे भाजपविरोधात समविचारी पक्षांनी एकत्र येण्याचं आवाहन शरद पवारांनी केलं असताना अहमदनगर महापौर निवडणुकीतली ही भाजप-राष्ट्रवादीची ही यारी-दोस्ती लक्षणीय ठरली. देशासह राज्यात आघाडी-महाआघाडीचे वारु दामटवण्याचा प्रयत्न सुरु असताना अहमदनगरने मात्र वेगळंच राजकीय वळण घेतलं. अहमदनगर महापालिकेत सर्वात मोठा पक्ष असलेल्या शिवसेनेला बाजूला सारत भाजपनं राष्ट्रवादीच्या साथीनं सत्ता मिळवली आहे. त्यामुळं शिवसेनेमध्ये संताप आहे. शिवसेनेचे मुखपत्र 'सामना'च्या अग्रलेखातून उद्धव ठाकरे यांनी आज या संताप व्यक्त केला आहे. 'बारा महिने तप केलं अन् गाढवासंगं पाप केलं...' या कवितेच्या ओळींचा आधार घेऊन उद्धव यांनी भाजप, राष्ट्रवादीवर हल्लाबोल केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यावर नगरला भाजपचा महापौर, उपमहापौर बसला आहे. राष्ट्रवादीने हा पाठिंबा बिनशर्त दिल्यामुळे दोघांचेही



खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हे पुन्हा दिसून आले. २०१४ साली याच राष्ट्रवादीने भाजपला सरकार स्थापनेसाठी असाच बिनशर्त पाठिंबा देऊ केला होता. म्हणजे भाजप व राष्ट्रवादीचे हे लफडे जुनेच आहे व आमचे कोणतेही अनैतिक संबंध नाहीत असे ते उगाच सांगत असतात. यानिमित्ताने दोघेही नागडे झाले आहेत व महाराष्ट्र त्यांच्यावर हसत आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर बिनशर्त पाठिंबा जाहीर करून राष्ट्रवादीने सिंचन घोटाळ्यातील त्यांच्या पुढाऱ्यांना कवचकुंडले मिळवली व आता नगर महापालिकेत पाठिंबा देऊन केडगाव खून प्रकरणातील स्वतःच्या आमदारांना साफ करून घेतले. ही एक प्रकारे सौदेबाजीच म्हणावी लागेल. एका बाजूला म्हणायचे शिवसेना हाच भाजपचा नैसर्गिक मित्र आहे.

## राहुल गांधींची आयडिया अमित शहांनी उचलली!

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** भाजपचे ९१ वर्षीय नेते लालकृष्ण अडवाणी आणि ८४ वर्षीय नेते डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी आता राहुल गांधी यांचे खरे तर आभार मानायला



हवेत. राहुल यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना निवडणुकीत प्राधान्य दिले म्हणूनच राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांत काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. भाजप नेतृत्वानेही राहुल यांची यशस्वी ठरलेली ही कल्पना उचलली असून, वयाची ७५ वर्षे ओलांडलेल्या नेत्यांनासुद्धा लोकसभा निवडणूक लढण्याची संधी दिली जाणार आहे. पक्षाच्या नेत्यांना लोकसभेच्या उमेदवारीसाठी वयाची ७५ वर्षे ओलांडल्याचे बंधन आता राहणार नाही, असे भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी एका बंदद्वार बैठकीत सांगितले. तरुण चेहरे मैदानात उतरविण्यापेक्षा विजयी होण्याचे सामर्थ्य कुणात आहे, हा घटक महत्त्वाचा मानला जाणार आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी माजी उपपंतप्रधान अडवाणी आणि माजी केंद्रीय मंत्री मुरली मनोहर जोशी यांचा समावेश 'मार्गदर्शक मंडळा'त करून, त्यांना निवडणुकीपासून दूर ठेवले होते.

# नववर्षाच्या तोंडावर ठाणे पोलिसांची मोठी कारवाई
## १० पिस्तूलं, ४० जिवंत काडतूसं जप्त

**ठाणे (तृप्ती गोरे)-** ठाणे पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. २ अट्टल गुन्हेगारांसह पोलिसांनी १० पिस्तूल, ४० जिवंत काडतूसे जप्त केली आहेत. खंडणी घेणे, सुपारी घेणे, हत्यार सप्लाय करण्याची कामं हे आरोपी करत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. राज्यातील पिस्तूल सप्लाय करणारी ही टोळी असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे. त्याचबरोबर राज्यातील अनेक मोठ्या व्यक्ती यांच्या टार्गेटवर असल्याचं पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी



पत्रकार परिषद घेऊन सांगितलं आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला मोठा हल्ला करण्याचा आणि घातपात घडवण्याचा या टोळीचा प्रयत्न असल्याचंही पोलिसांनी म्हटलं आहे. दरम्या, ऐन नव्या वर्षात पोलिसांनी केलेली ही मोठी कारवाई मानली जात आहे. तर इथून मागे झालेल्या हत्या आणि हल्ल्यांशी या टोळीचा काही संबंध आहे का याचाही आता पोलीस तपास करत आहेत. ताब्यात घेतलेल्या २ जणांची आता ठाणे पोलीस कसून चौकशी करणार असल्याचं सांगण्यात येत आहे.

## प्रसूतीदरम्यान बाळाचा मृत्यू, पत्नी गंभीर, पतीची रुग्णालयातच आत्महत्या

**जळगाव-** जिल्हा रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या पत्नीची स्थिती गंभीर व जन्माआधीच मुलाचा मृत्यू झाल्याने आता जगून काय उपयोग आहे. या विवंचनेत देवला बारका बारेला (वय २६, रा. रामजीपाडा, उनपदेव ता.चोपडा) यांनी जिल्हा रुग्णालयात परिसरातीलच वृक्षाला स्वतःकडील रुमालाने गळफास घेतला. सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला आहे.

चोपडा तालुक्यातील रामजीपाडा येथे देवलाची पत्नी उबऱ्याबाई, मुलगा सोनगीश, मुलगी शारदाबाई, राहबाबाई यांच्यासह आई, वडिलांसह वास्तव्यास आहे. दुसऱ्याच्या शेतात काम करुन उदरनिर्वाह करणारे हे कुटुंब. प्रसूतीदरम्यान बाळाचा मृत्यू झाल्याने चोपडा येथील ग्रामीण रुग्णालयातून देवला यांची पत्नी उबऱ्याबाई हिला दोन दिवसांपूर्वीच जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. बाळाला वाचविण्यासाठी डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली. शर्थीचे प्रयत्न करुनही बाळाचा मृत्यू झाला. यानंतर उबऱ्याबाई हिचा रक्तश्राव झाल्याने तिची प्रकृती गंभीर आहे,. तिला दररोज रक्त



देण्यात येत आहे. तिच्याजवळ रुग्णालयता आई ढेमाबाई उनकार बारेला व पती देवला बारेला हे थांबले होते.

रविवारी रात्री देवला जेवण करण्यासाठी उबऱ्याबाईकडे आले. याठिकाणी दोघांनी जेवण केले. यानंतर देवला सासू ढेमाबाई यांना सांगून झोपण्यासाठी प्रसूती कक्षातून जिल्हा रुग्णालय आवारात आला.

## नमन - नम नटराज - नृत्य कलेशी निगडीत केअर फाउंडेशन चा गरजू व हुन्नरबाज मुलांसाठी नवीन उपक्रम

**मुंबई (सम्यक कासारे)-** अंधेरी पश्चिम येथील केंटस्टार हॉल येथे केअर फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने नृत्य कलाकार व दिग्दर्शक श्री अजय मेहत्री सोबत एक नवीन व अद्वितीय अशा उपक्रमाला सुरुवात केली आहे. प्रत्येक वेळी नवीन व स्तुतीजनक उपक्रमांना चालना देणाऱ्या केअर फाउंडेशन ने यावेळी नमन या शीर्षकाखाली एक नृत्य उपक्रम राबविण्याचे सुरु केले आहे. या उपक्रमांतर्गत गरीब परिस्थितीत वाढणाऱ्या मुलांना प्रोफेशनल नृत्य कलेबाबतीत ज्ञान मिळवण्याची व सराव करण्याची संधी देण्याचे प्रयत्न व विचार संस्थेचे अध्यक्ष श्री अनिकेत घनश्याम भंकाळ यांचे आहे. या वर्कशॉप ला एकूण ४० मुलांचा समावेश झाला ज्यामध्ये सानपाडा येथील वात्सल्य ट्रस्ट या अनाथ आश्रमातील व आसपास च्या परिसरातील गरजू मुलांचाही समावेश होता. श्री अजय मेहत्री यांच्या मर्गदर्शनाखाली सर्व मुले अतिशय उत्साहात नृत्य शिकत होती. मुलांचा उत्साह वाढविण्याच्या उद्देश्याने यावेळी सुपर डान्सर महाराष्ट्र व डान्स दिवाने फेम कु. पार्थ खुटाळे व त्याचा हुनरबाज धाकटा भाऊ कु. प्रेम खुटाळे उपस्थित होते. या सोबत नुकतीच मिस टीन लुमियर २०१८-१९ निवडली गेलेली कुमारी. मुस्कान कोतवानी ही देखील उपस्थित होती. सर्व अतिथींचे स्वागत श्रीमती भावना जैन यांनी संस्थेच्या सचिव या नात्यानी केले. वर्कशॉपच्या अंतिम क्षणांमध्ये अध्यक्ष श्री अनिकेत भंकाळ यांनी या उपक्रमाला गरजू मुलांपर्यंत पोहचविण्याचा आपला निर्धार स्पष्ट करून युवकांना या ध्येयात शामिल होण्याचे आवाहन ही केले.



